SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**

Arts, Commerce and Science (Granted)

Dist. Chandrapur (M.S.) 442903

# सुचना

**इमारत व सोयी सुविधा देखभाल समिती इतिवृत्त**

**ऑगष्ट 2023**

इमारत व सोयी सुविधा देखभाल समितीच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 21 ऑगष्ट 2023 रोज सोमवारला ठीक सकाळी 11:00 वाजता इमारत व सोयीसुविधा देखभाल समितीची सभा मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. करिता सभेला खालील सर्व समिती सभासदांनी उपस्थित राहावे, ही विनंती.

सभेमध्ये पुढील विषयांवर चर्चा करण्यात येईल.

विषय क्र.1:-मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

विषय क्र.2:-वर्ग खोल्यांतील ट्यूबलाइट फॅन तसेच पिण्याच्या पाण्याचे पाणी फिल्टर, डेक्स बेंचेसची दुरुस्ती इत्यादी करणे.

विषय क्र.3:-महाविद्यालयाच्या प्रांगणात डस्टबिनची व्यवस्था करणे.

विषय क्र.4:- अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | ---------------------- |
| २) प्रा. हुमेश्वर आनंदे -समिती सदस्य | ---------------------- |
| 3) डॉ.बिजनकुमार शिल-समिती सदस्य | ---------------------- |
| ४) डॉ.युवराज बोधे -समिती सदस्य | ---------------------- |

समिती समन्वयक

प्रा. संदिप मेश्राम

प्राचार्य

Principal

Gramgeeta Mahavidyalaya

Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI
**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**
Arts, Commerce and Science (Granted)
Dist. Chandrapur (M.S.) 442903

**इमारत व सोयी सुविधा देखभाल समिती इतिवृत्त**
**ऑगष्ट 2023**

ग्रामगीता महाविद्यालय चिमूर येथील महाविद्यालयाचे इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची सभा मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक 21 ऑगष्ट 2023 रोज सोमवारला ठीक सकाळी 11:30 वाजता घेण्यात आली. सभेला समितीचे सर्व सभासद उपस्थित होते आणि महाविद्यालयाच्या इमारतीच्या देखभाली संबंधी खालील विषयावर चर्चा करण्यात येऊन ठराव मंजूर करण्यात आले.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | |
| २) प्रा. हुमेश्वर आनंदे -समिती सदस्य | |
| 3) डॉ.बिजनकुमार शिल-समिती सदस्य | |
| ४) डॉ.युवराज बोधे -समिती सदस्य | |
| ५) प्रा. संदिप मेश्राम- समिती समन्वयक | |

**विषय क्र.1:-मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

ठराव क्र.1:-

इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची मागील बैठक ही दिनांक 16 जानेवारी 2023 रोजी घेण्यात आली होती त्या सभेचे इतिवृत्त समितीचे समन्वयक प्रा. संदीप मेश्राम यांनी उपस्थित सभासदांसमोर वाचून दाखविले या इतिवृत्तावर औपचारिक चर्चा करून **ठराव मंजूर करण्यात आले.**

**विषय क्र.2:-वर्ग खोल्यांतील ट्यूबलाइट फॅन तसेच पिण्याच्या पाण्याचे पाणी फिल्टर डेक्स बेंचेस ची दुरुस्ती इत्यादी करणे.**

ठराव क्र.2:-

आजच्या सभेमध्ये प्राध्यापक बिजनकुमार शील यांनी महाविद्यालयातील वर्ग खोल्यांमध्ये असलेले ट्यूबलाइट व फॅन यांची दुरुस्ती करावी लागते अशी माहिती दिली तसेच प्राध्यापक हुमेश्वर आनंदे यांनी पिण्याचे पाण्याचे फिल्टर ची दुरुस्ती करावी लागेल तसेच काही डेस्क बेंचेस मोडकळीस आलेले असून त्यांना रिपेरिंग करणे आवश्यक आहे असे सांगितले असता सभेमधील सर्व सदस्यांनी याबाबतीत सहमती दर्शवून पाठिंबा दिला त्यामुळे सर्वानुमते **ठराव मंजूर करण्यात आले.**

**विषय क्र.3:-महाविद्यालयाच्या प्रांगणात डस्टबिनची व्यवस्था करणे.**

**ठराव क्र.3:-**

सभा सुरू असताना प्राध्यापक युवराज बोधे यांनी महाविद्यालयाच्या प्रांगणात डस्टबिनची आवश्यकता आहे जेणेकरून महाविद्यालयातील ओला कचरा व सुका कचरा वेगळा ठेवण्यात येईल अशी व्यवस्था असली पाहिजे असे मत मांडले असता अध्यक्ष प्राचार्य डॉ. धमानी यांनी सहमती दर्शवत डस्टबिन खरेदी करण्यासंबंधी सहमती दर्शविली.ठराव **सर्वांनूमते मंजूर करण्यात आले.**

**विषय क्र.4:- अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

**ठराव क्र.4:-**

आजची सभा सुरू असताना समिती समन्वयक प्रा. संदीप मेश्राम यांनी माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने प्रश्न उपस्थित केला की, ग्रंथपालांच्या केबिनमध्ये असलेल्या खिडकी मधून सूर्यप्रकाश खूप प्रमाणात येत असल्यामुळे प्रकाश परिवर्तनाची समस्या भासत आहे त्यामुळे प्रकाशअवरोधी काच खिडकीमध्ये लावण्यात यावे अशी विनंती सभेला केली असता सर्वांनी सहमती दर्शवून होकार दिला. **सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले.**

प्रा. संदिप ए. मेश्राम
समिती समन्वयक

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI

**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**

Arts, Commerce and Science (Granted)

Dist. Chandrapur (M.S.) 442903

# सुचना

**इमारत देखभाल व सोयी सुविधा समिती इतिवृत्त**
**जानेवारी 2024**

महाविद्यालयाच्या इमारत व सोयीसुविधा देखभाल समितीच्या सर्व सदस्यांना सूचित करण्यात येत आहे की, दिनांक 20 जानेवारी 2024 रोज शनीवारला ठीक सकाळी 11:00 वाजता समितीची सभा मा. प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात येत आहे. करिता सभेला खालील सर्व समिती सभासदांनी उपस्थित राहावे. ही विनंती.

सभेमध्ये पुढील विषयांवर चर्चा करण्यात येईल.

विषय क्र.1:-मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

विषय क्र.2:-महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेंच्या खोल्यांना Exhaust फॅन लावणे आणि विद्यार्थ्यांच्या युरीन रूम मध्ये तुटलेले यूरिन सीट, नळाच्या तोट्या इत्यादी बदल करणे.

विषय क्र.3:-प्राचार्यांच्या ऑफिसमध्ये showcase तयार करणे.

विषय क्र.4:- माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | ------------------------------- |
| २) प्रा. हुमेश्वर आनंदे -समिती सदस्य | ------------------------------- |
| 3) ) डॉ.बिजनकुमार शिल-समिती सदस्य | ------------------------------- |
| ४) ) डॉ.युवराज बोधे -समिती सदस्य | ------------------------------- |

समिती समन्वयक
प्रा. संदिप मेश्राम

प्राचार्य

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur

SEMANA VIDYA VA VAN VIKAS PRASHIKSHAN MANDAL, GADCHIROLI
**Gramgeeta Mahavidyalaya, Chimur**
Arts, Commerce and Science (Granted)
Dist. Chandrapur (M.S.) 442903

**इमारत देखभाल व सोयी सुविधा समिती इतिवृत्त**
**जानेवारी 2024**

आज दिनांक 20 जानेवारी 2024 रोज शनीवारला महाविद्यालयाच्या इमारत देखभाल व सोयीसुविधा समितीची बैठक आयोजित करण्यात आली. या सभे या सभेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांच्यासह सर्व सभासद उपस्थित होते त्यांनी खालील विषयावर चर्चा करून ठराव मंजूर केले.

| सभासदांचे नाव | सह्या |
|---|---|
| १) डॉ. अमीर धमानी-प्राचार्य (अध्यक्ष) | ---------------- |
| २) प्रा. हुमेश्वर आनंदे -समिती सदस्य | ---------------- |
| 3) डॉ.बिजनकुमार शिल-समिती सदस्य | ---------------- |
| ४) डॉ.युवराज बोधे - समिती सदस्य | ---------------- |
| ५) प्रा. संदिप मेश्राम- समिती समन्वयक | ---------------- |

**विषय क्र.1:-मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**
**ठराव क्र1:-**

इमारत देखभाल व सोयी सुविधा समितीची मागील बैठक ही दिनांक 21 ऑगष्ट 2023 रोज सोमवारला रोजी संपन्न झाली होती. त्या सभेचे इतिवृत्त व करण्यात आलेल्या देखभालीच्या कामाचा आढावा घेण्यात आला. यावर सर्व सभासदांनी साधक-बाधक चर्चा करून **ठराव मंजूर केले.**

**विषय क्र.2:-महाविद्यालयाच्या प्रयोगशाळेच्या खोल्यांना Exhaust फॅन लावणे आणि विद्यार्थ्यांच्या युरीन रूम मध्ये तुटलेले यूरिन शीट, नळाच्या तोट्या इत्यादी बदल करणे.**

**ठराव क्र.2:-**

आजची सभा सुरू असतांना डॉ. बिजनकुमार शील यांनी असे सांगितले की, प्रयोगशाळेमध्ये शुद्ध हवा खेळती राहावी याकरिता Exhaust फॅन लावणे आवश्यक आहे. तसेच प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी विद्यार्थ्यांच्या यूरिनरी मधील युरिन शीट तसेच नळाच्या तोट्या व पाईप तुटलेले आहेत, त्यामुळे ते बदलविण्यात यावे असे सांगितले. यावर समितीच्या सर्व सभासदांनी चर्चा केली आणि उपरोक्त विषयाला होकार दर्शवत **सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले.**

**विषय क्र.3:-प्राचार्यांच्या ऑफिसमध्ये शोकेस तयार करणे.**

**ठराव क्र.3:-**

आजच्या सभेमध्ये डॉ. युवराज बोधे यांनी अशी सूचना केली की प्राचार्यांच्या ऑफिस मधील भिंतीला showcase तयार करून त्यामध्ये महाविद्यालयाला प्राप्त झालेले शील्ड ठेवण्यात यावे जेणेकरून विद्यार्थ्यांनी बघितल्यानंतर त्यांना अनेक स्पर्धांमध्ये सहभागी होण्याची व महाविद्यालयाचे प्रतिनिधित्व करून वेगवेगळे पारितोषिक मिळविण्यासाठी प्रेरणा निर्माण होईल असे मत सादर केले असता उपस्थित सर्व सभासदांना त्यांचे म्हणणे पटले त्यामुळे सर्वांनी **एकमताने ठराव मंजूर केला.**

**विषय क्र.4:- माननीय अध्यक्ष यांच्या परवानगीने वेळेवर येणारे विषय.**

**ठराव क्र.4:-**

आजच्या सभेमध्ये माननीय अध्यक्ष यांची परवानगी घेऊन प्रा. हुमेश्वर आनंदे यांनी महाविद्यालयाच्या परिसराला प्रवेशद्वार असायला पाहिजे असे चर्चेदरम्यान सांगितले. यावर प्राचार्य डॉ. अमीर धमानी यांनी सहमती दर्शवत संस्थेच्या व्यवस्थापना सोबत चर्चा करून प्रवेशद्वार बांधकाम करून घेऊ असे आश्वासन दिले. यानंतर सभेत कोणत्याही सभासदाने प्रश्न उपस्थित न केल्यामुळे **सर्वानुमते ठराव मंजूर करण्यात आले** व उपस्थित सभासदांचे आभार मानून सभा समाप्त करण्यात आली.

प्रा. संदिप ए. मेश्राम
समिती समन्वयक

Principal
Gramgeeta Mahavidyalaya
Chimur, Dist. Chandrapur